श्री.विठ्ठल रूक्मिणी मंदिरे समिती, पंढरपूर

श्री.विठ्ठल रूक्मिणीचे फोटो लॅमीनेशन करणे कामाचे जाहीर दरपत्रक

श्री. विठ्ठल रूक्मिणीचे फोटो ८ व १२ एमएम प्लायवुडवर लॅमीनेशन करणेकामी जाहीर दरपत्रके मागविण्यात येत आहेत. या संबंधीची माहिती, अटी, शर्ती व दरपत्रक फॉर्म तुकाराम भवन, पंढरपूर येथे आणि www.vitthalrukminimandir.org या वेबसाईटवर उपलब्ध आहे. इकडील नमूना फॉर्ममध्येच दरपत्रक भरून देणेची आहे. तसेच अनामत रक्कम रू.२५,०००/–डी.डी./रोख स्वरुपात भरणे आवश्यक आहे. सिलबंद दरपत्रके कार्यकारी अधिकारी, श्री.विठ्ठल रूक्मिणी मंदिरे समिती, पंढरपूर यांचे नावे दि.२०/०१/२०१७ रोजी सायं. ५:०० वाजेपर्यंत पोहोचेल अशी पाठवावी. प्राप्त निविदा त्याच दिवशी तुकाराम भवन येथे सायं. ५:०० वा. उघडल्या जातील.

क्र.दर्शन मंडप/कावि/५१(१)/२०१७ दि. १२/०१/२०१७

(सही XXX)

कार्यकारी अधिकारी

(संपर्क क्र. ०२१८६–२२४४६६ ९९२१९६६८०८)

## श्री.विठ्ठल रूक्मिणी मंदिरे समिती, पंढरपूर

श्री.विठ्ठल रूक्मिणीचे फोटो लॅमीनेशन करणे कामाचे जाहीर दरपत्रक.

**माहिती, अटी व शर्ती खालीलप्रमाणे आहे.**

१. नमूना दरपत्रक फॉर्म कार्यालयीन वेळेत तुकाराम भवन येथे उपलब्ध होवून मिळतील. तसेच www.vitthalrukminimandir.org या वेबसाईटवर मिळतील. दरपत्रक फॉर्म स्वतंत्र लिफाप्यात सिलबंद करून सादर करणे आवश्यक आहे. लिफाप्यावर ठेकेदाराचे नाव व पूर्ण पत्ता आणि निविदा श्री.विठ्ठल रूक्मिणीचे फोटो लॅमीनेशन करणे कामासाठी भरलेली आहे, असा सविस्तर तपशिल नमुद करावा. दरपत्रक समक्ष तुकाराम भवन येथे सादर कराव्यात किंवा रजिस्टर पोस्टाने पाठवावे. उशीरा आलेले दरपत्रक विचारात घेतले जाणार नाही.

२. अनामत रक्कम रू.१५,०००/—डी.डी./रोख स्वरुपात भरणे आवश्यक आहे. डी.डी. 'कार्यकारी अधिकारी, श्री. विठ्ठल रूक्मिणी मंदिरे समिती, पंढरपूर' यांचे नावे काढावा.

३. पुरवठादाराने दरपत्रक फॉर्ममध्ये नमुद केलेल्या दराने ०१ फेब्रुवारी २०१७ ते ३१ जानेवारी २०१८ या कालावधीत श्री.विठ्ठल रूक्मिणीचे फोटो लॅमीनेशन करून पुरवठा इकडील मागणी प्रमाणे करणे आवश्यक आहे.

४. पुरवठा करावयाच्या फोटोचा तपशिल खालीलप्रमाणे आहे.

| मालाचा प्रकार | अंदाजे लागणारे फोटो (प्रति महिना) |
|---|---|
| वेगवेगळया आकारातील फोटो लॅमिनेशन करणे. | **५०० नग** |

५. मंदिर समितीने ठरवून दिलेल्या अथवा निश्‍चित केलेल्या नमुन्यांतच मालाचा पुरवठा करणेचा आहे.

६. लॅमीनेशन करण्यात आलेल्या फोटोची गुणवत्ता चांगली असणे आवश्यक आहे.

७. फोटो लॅमिनेशनसाठी वापरण्यात येणारे साहित्य— प्लायवूड, अधेजीव, लिक्वीड, क्लिपा आणि लॅमिनेशन पेपर उत्तम प्रतीचे व चांगले दर्जाचे असणे आवश्यक आहे.

८. फोटो विक्रीची परवानगी असलेबाबत सर्व प्रकारच्या शासकिय परवान्याच्या प्रती दरपत्रक अर्जासोबत जोडणे आवश्यक आहे. तसेच फॉर्ममध्ये नमूद केलेली सर्व कागदपत्रे सोबत सादर करणे आवश्यक आहे.

९. सदर मालाचा पुरवठा मंदिर समितीचे मागणीनुसार मुदतीत करणेचा आहे. त्यास विलंब झालेस पुरवठाधारकास जबाबदार धरून मालाच्या किमतीच्या ५ टक्के पर्यंत दंड आकारण्यात येईल.

१०. माल खराब असल्याचे आढळून आलेस पुरवठा धारकास जबाबदार धरणेत येईल व त्याचे बील अदा केले जाणार नाही.

११. पुरवठा करण्यात आलेल्या मालाची प्रत व प्रमाण संबंधित विभागाकडून मोजणी व तपासणी करून खात्री झाले खेरीज बील अदा केले जाणार नाही.

१२. मालाचा पुरवठा करणेचे ठिकाण दर्शनमंडप विभाग आहे.

१३. दरपत्रकात नमुद साहित्याचा दर सर्व करासहीत नमुद करावा. साहित्य पोहचविण्याचा वाहतुक खर्च, हमाली अथवा इतर अतिरिक्त कोणताही खर्च पुरवठाधारकास दिला जाणार नाही.

१४. दरपत्रकात नमुद सर्व साहित्यांचा दर नमूद करणे आवश्यक आहे. अपूर्ण दरपत्रकांचा विचार केला जाणार नाही.

१५. सदर कामाचे मंजुर दराव्यतिरिक्त कोणताही कर अदा केला जाणार नाही. तसेच सदर कामाचे बिल अदा करताना नियमानुसार २ टक्के आयकर कपात केली जाईल.

१६. सदर कामासाठी ॲडव्हान्स रक्कम अदा केली जाणार नाही.

१७. माल वाहतुकी दरम्यान झालेल्या कोणत्याही दुर्घटनेस पुरवठाधारक जबाबदार राहील.

१८. समिती वेळोवेळी जे निर्देश देईल अथवा अटीत जे बदल करेल ते पुरवठाधारकांस बंधनकारक राहील.

१९. निविदा ज्यांचे नांवे मंजूर झालेली आहे त्यांनी रक्कम रूपये १००/— चे स्टॅम्प पेपरवर सर्व अटी व शर्ती मान्य असलेबाबतचे (affidivit) प्रतिज्ञापत्र करून देणे आवश्यक आहे.

२०. सदर कामासंबंधी काही वाद उद्‌भल्यास त्यासाठी न्यायालयीन कार्यक्षेत्र पंढरपूर हे राहील.

२१. वरील कोणत्याही एका अटी व शर्तीचा भंग झालेस पुरवठा धारकास जबाबदार धरणेंत येईल व मंजूर पुरवठा आदेश कोणत्याही क्षणी रद्‌द केली जाईल.

२२. प्रशासकीय व अन्य कारणास्तव पुरवठा प्रक्रिया कोणत्याही स्तरावर रद्‌द करण्याचा अधिकार मंदिर समितीने राखुन ठेवलेला आहे.

———————''————————

श्री. विठ्ठल रूक्मिणी मंदिरे समिती, पंढरपूर

**दरपत्रक फॉर्म**

श्री. विठ्ठल रूक्मिणीचे फोटो लॅमीनेशन करणे कामाचे जाहीर दरपत्रक

प्रति,
मा. कार्यकारी अधिकारी,
श्री. विठ्ठल रूक्मिणी मंदिरे समिती, पंढरपूर.

विषय:— श्री.विठ्ठल रूक्मिणीचे फोटो लॅमीनेशन करणे कामाचे दरपत्रक.

ठेकेदाराचे पूर्ण नाव :— श्री.—————————————————————

पूर्ण पत्ता :— —————————————————————

—————————————————————

मोबाईल क्रं.:— —————————————————————

महोदय,

श्री.विठ्ठल रूक्मिणी मंदिर समिती, पंढरपूरचे वतीने श्री.विठ्ठल रूक्मिणीचे फोटो लॅमीनेशन करणे कामाची दिनांक १३/०१/२०१७ रोजीचे दैनिक पुढारी, सोलापूर या वर्तमानपत्रामध्ये प्रसिध्द झालेल्या जाहीर दरपत्रकाप्रमाणे सदर कामाचे दरपत्रक खालीलप्रमाणे सादर करीत आहेत.

| अ क्र | तपशील | दर रू. प्रती चौ.इंचास |
|---|---|---|
| ०१ | वेगवेगळया आकारातील फोटो लॅमिनेशन करणे. | |

सदर दराने श्री.विठ्ठल रूक्मिणीचे फोटो लॅमीनेशन करून १ वर्षभर पुरवठा करणेस मी बांधील राहील. तसेच याबाबतच्या आपणाकडून देण्यात आलेल्या अटी व शर्ती मला मान्य असून त्यासंबंधीचे जरूर ते प्रतिज्ञापत्र स्टॅम्पपेपरवर करून देण्यास तयार आहे. रू.२५,०००/— अनामत रकमेचा डी.डी./जमा पावतीची झेरॉक्स प्रत सोबत जोडली आहे. तरी वर नमुद दरपत्रकाप्रमाणे श्री.विठ्ठल रूक्मिणीचे फोटो लॅमीनेशन करून पुरवठा करणेचे काम मला मिळण्यास विनंती आहे.

दिनांक /०१/२०१७ पुरवठाधारकाची सही व शिक्का

सोबत खालील कागदपत्रे जोडलेली आहेत.

१. अनामत रक्कमेचा डी.डी/ रोखीच्या पावतीची झेरॉक्स प्रत.
२. पूर्वी फोटो लॅमीनेशन करून पुरवठा केलेल्या कामाची अनुभवाची प्रमाणपत्रे.
३. स्वत:च्या ओळखपत्राची झेरॉक्स प्रत. (उदा. पॅनकार्ड, मतदान कार्ड व आधारकार्ड)
४. सदर कामासाठी आवश्यक असलेल्या शासकीय परवान्यांच्या प्रती.
५. पॅनकार्ड.
६. शॉप ॲक्ट लायसन्स.